ISSN No-2031-5063 Vol.1,Issue.III/Sept 11pp.1-4

Research Paper

# जेश्ठागौरी पूजन (महालक्ष्मी)

प्रा.डॉ. षरद जा. वाघोळे
मराठी विभाग प्रमुख
यशवंतराव चव्हाण कला व विज्ञान महाविद्यालय
मंगरूळपीर, जि. वाशिम.

भाद्रपद महिण्यातील या 'जेश्ठा गौरी' पूजनास आकोट परिसरातील लोकजीवनात 'महालक्ष्मी पूजन' असे म्हटले गेले आहे. या जेश्ठा 'गौरी' च्या पूजनाचा सण आवाहन, पूजन व विसर्जन असा तीन दिवस केला जातो. भाद्रपद शुक्ल पक्षातील अनुराधा नक्षत्रावर गौरीचे आवाहन, जेश्ठा नक्षत्रावर गौरीचे पूजन व मूळ नक्षत्रावर विसर्जन असा हा महालक्ष्मी पूजनाचा सण आकोट परिसरातील लोकांच्या घरातून साजरा होतो. जेश्ठा गौरी पूजना संदर्भात डॉ. शरद व्यवहारे यांनी म्हटले आहे की, ''स्त्री–जीवनात या उत्सावाला विशेश महत्व आहे हा उत्सव साजरा केल्याने पतीला आरोग्य आणि घरात संपन्नता येते, अशी श्रध्दा लोकमानसात दिसून येते.''1 लोकांच्या विश्वासात अनेक श्रध्दा, चालीरीती, या परंपरा सुखी जिवन लाभावे या इच्छेने रूढ झाल्या आहेत. महालक्ष्मी पूजनाचे व्रत हा सण अत्यंत काटेकोरपणे व विधिवत साजरा केला जातो. त्या मध्ये कोणतीही चूक होणार नाही, याची दक्षता घेतली जाते. काही भारतीय देवता विघ्न स्वरूपाच्या आहेत. त्यापैकी जेश्ठा अलक्ष्मीच्या संदर्भात डॉ. रा. चिं. ढेरे यांनी आपले मत व्यक्त केले आहे

''भारतीय दैवतमंडलातील जेश्ठा देवी ही अनिश्ट दैवतांत गणली जाते. ती लक्ष्मीची जेश्ठ भगिनी समजली जात असल्यामुळे तीला 'जेश्ठा' म्हणतात आणि लक्ष्मीविरोधी गुणांनी युक्त असल्यामुळे तिला अलक्ष्मी म्हणतात. लक्ष्म म्हणजे लक्षण. परंतु गुण शब्दाचा अर्थ जसा सद्‌गुण असा ही होतो, त्या प्रमाणे लक्ष्म शब्दाचा अर्थ सुलक्षण असाही होतो. अर्थातच लक्ष्मी म्हणजे सुलक्षणांनी युक्त आणि तद्‌विरोधी अलक्ष्मी म्हणजे कुलक्षणांनी युंक्त, त्याच मुळे लक्ष्मीच्या जन्माशी अमृताचे आणि अलक्ष्मीच्या जन्माशी हलाहलाचे साहचर्य पुराणकथांनी कल्पिले आहे.''2 या डॉ. रा. चिं. ढेरे यांच्या मताच्या आधारे महालक्ष्मीच्या पूजनासंदर्भात कडक स्वरूपाचे व्रत का पळण्यात येते? याचा अर्थ कळतो आपल्या जीवनात लक्ष्मीने कोणतीही संकटे आणू नये, घरात सुख, शांती, धनसंपदा कायम राहावी या करिता लोकांनी महालक्ष्मीची पूजा केली आहे.

या जेश्ठा गौरी पूजनाच्या उत्सव प्रसंगी स्त्रिया महालक्ष्मीला रास अर्पण करतात. आकोट परिसरात यावेळी मातीच्या 'पुतळा' व 'पुतळी' च्या मूर्ती वाहण्यात येतात.

त्यासोबत घरातील धनधान्य स्वरूपात अर्पण करतात. महालक्ष्मी नवसाला पावते. ती जागृत देवता आहे. त्यामुळे भीतीयुक्त आदर या उत्सवाच्या बाबत लोकजीवनात दिसतो. डॉ. लता लांजेवार यांनी या संदर्भात मत दिले आहे. त्यांच्या मते ''काहीही चूक होणार नाही याची पुरेपूर काळजी यात घेतली जाते, अन्यथा महालक्ष्मी लवकर कोपते, घरात काहीतरी संकटे येतात असा लोकमनाचा समज आहे''3 महालक्ष्मीच्या पूजनाच्या निमित्ताने अनेक रीतीरिवाज रूढ दिसतात. अन्न उश्टे टाकू नये, खरकटे हात अन्न पायदळी येऊ देऊ नये तसेच हात समृद्रात धुवावे, अर्थात गोलाकार खड्डा करून त्यात धुवावे, अशी धारणा आहे. थोडक्यात घरातील सुख, समृध्दी, धन, धान्याची भरभराट तसेच अरिश्ट निवारण याचा संबंध या जेश्ठागौरी पूजनासोबत जोडला आहे. आकोट मधील 'पणज' या गावी महालक्ष्मीचे कायम स्वरूपी मंदिर आहे. कायम स्वरूपी मंदिर हे अकोला जिल्ह्याचे वैशिश्ट्य आहे. भारतीय लोकजीवनाचा प्रवाह हा अनेक वर्शापासून अखंडपणे वाहत आहे. येथील लोकजीवन व लोक संस्कृती अनेक वर्शापासून नवीन नवीन आचार व विचार यांचा स्वीकार करत पुढे जात आहे. गेली हजारो वर्श असे नवीन विचार लोकांनी आपल्या जीवनात सामावून घेतले आहेत. रूढी, प्रथा, परंपरा, देव यांची त्यात सतत भर पडत गेली. भारतीय लोकसंस्कृतीने जुने व नवीन असे दोन्ही प्रवाह आपल्या जीवनात स्वीकारले आहेत. त्यामुळे लोकजीवनातील प्रथा, परंपरेत सतत वाढ झाली आहे. मानवाने अनेक वर्शापासून देव–देवी यांच्या विशयी काही धारणा कायम केल्या आहेत.

लोकजीवनाच्या धार्मिक परंपरेत शिव व पार्वती या देवतांना अनेक वर्शापासून पूजल्या गेले आहे. आपल्या भारतीय परंपरेत मातृसत्ता व पितृसत्ता अशा दोन्ही संस्कृतीचा समन्वय साधला गेला आहे. प्रचिन व भारतीय लोकजीवनाचा विचार केला असता असे लक्षात येते की, भारतातील मूळ संस्कृती मातृसत्ताक होती. या संबंधी डॉ. स. रा. गाडगीळ यांनी निर्वाळा दिला आहे. ते म्हणतात, ''मातृसत्ता हा प्राचिन भारतातील गणजीवी समाजरचनेचा एक महत्त्वाचा विशेश आहे. आजही गणजीवी समाजाचे जे अनेक अवशेश लोकजीवनात आढळून येतात, त्यामध्ये स्त्री–प्रधान व्रतांचे आचरण आणि देवी, जगदंबा, रेणुका या स्त्री देवतांचे माहात्म्य यांचा संबंध प्राचिन काळात अस्तित्वात असलेल्या मातृसत्ताकाशीच असला पाहीजे. हे उघड आहे. ज्या समाज रचनेत स्त्रीला महत्त्वाचे स्थान आहे त्याच समाजात स्त्री–देवतांना महत्व प्राप्त होते.''4 आकोट तालुक्यातील भागात या स्त्री–स्वरूपातील देवतांची पूजा भक्तिभावाने झाली आहे. गौरी, पार्वती, अंबा, लक्ष्मी, दुर्गा, ईनामाय ईत्यादी नावांनी या देवीची पूजा वेगवेगळ्या वेळी लोकमानसाने केली. श्रावण– भाद्रपद महीण्यातील गौरी ही महालक्ष्मी नावाने पूजल्या जाते. महाराश्ट्रात अनेक गावात महालक्ष्मीचे पूजा केली जाते. हा तीन दिवसाचा उत्सव आहे. परंतु आकोट पासून जवळच पणज या गावामध्ये महालक्ष्मीचे कायम स्वरूपी मंदिर बांधले आहे. या महालक्ष्मी मंदिराचे वैशिश्ट्य असे की येथे दगडाच्या देवीमूर्ती आहेत. यासंबंधी या गावातील परिसरात एक आख्यायिका लोकांच्या तोंडून सांगितली जाते. ती अशी ''पणज या गावापासून उत्तरेला पाच कि. मी. अंतरावर महागाव नावाचे गाव आहे. पूर्वी या गावाला मोठे महागाव असे म्हटले जात असे. साधारणतः तीनशे ते चारशेवर्शा पूर्वी हे गाव मालगुजारीचे मुख्य ठाणे म्हणजे राजधानी मानल्या जात होते. हल्ली हे गाव ओसाड पडले आहे. या गावात श्री करडे या नावाचा सरदार होता. तो जन्माने पायाळू होता. त्याने धनजागृत करून आपल्या महागावात या धनाला येण्याची विनंती केली. तेव्हा या लक्ष्मीरूपी धनाने त्यास एक अट घातली तू ज्या ठिकाणी वळून मागे पाहशील त्याच वेळी मी तेथेच थांबेल व तेथे माझे मंदिर उभारले जाईल. तेव्हा त्या सरदाराने ही अट मान्य केली. त्याने सर्व धन एका बंडीत भरून, आपल्या गावी आणावयास सुरूवात केली.

श्री करडे सरदार हे धन बंडीत भरून जुन्या रस्त्याने वडाळी मार्ग पिंपळोद या वाटेने जात होता. परंतु (पणज जुणे मौजे वाघोळा) या गावाजवळ आला असता गावाजवळील नदीमध्ये मोठा आवाज झाला. या आवाजाने तो घाबरून गेला. त्याने

दिलेले वचन मोडले व त्याने मागे वळून पाहिले. ठरल्याप्रमाणे लक्ष्मीरूपी हे धन गुप्त झाले. त्याच दिवशी लक्ष्मीरूपी देवीने श्री करडे यांना स्वप्नात जावून दृश्टांत दिला. आम्ही या नदी काठी थांबल्या आहोत. तेव्हा तू आम्हाला कायम स्वरूपी जागा उपलब्ध करून दे, तेव्हा त्याने या देवींना पाण्यातून बाहेर काढले. त्या ठीकाणी मंदिर बांधून त्या मंदिरात त्यांची स्थापना केली. हे मंदिर दगडी असून मंदिराच्या समोर भव्य दीपमाळ आहे. त्याला लागून एक विहीर आहे. व समोर नदी वाहते. तेव्हापासून पण हे गाव महालक्ष्मीचे माहेर मानले जाते. अशाच स्वरूपाची 'वळसा' या गावातील श्री व्याघ्रांबी व महालक्ष्मी यांची आख्यायिका सांगितली जाते.

''देवूळगाव वळसा या गावाच्या दोन किलोमीटर अंतरावर मागील काळात भयानक असं किर्र अरण्य होतं. त्या जंगलात व्याघ्रांबी–महालक्ष्मीचं जागृत देवस्थान होतं. त्याच देवूळगाव गावात राहणारी राऊत पाटील घराण्यातील भावीकभक्त सौ. तुळजाबाई रावजी राऊत हया दररोज नित्य नेमाने त्याच जंगलातील व्याघ्रांबी महालक्ष्मीची पूजा आरती करावयाच्या असा नित्य नेम चालू असतानाच दिवसेंदिवस त्यांचा वृध्दापकाळ आला.

त्या म्हातारपणामुळे त्यांना महालक्ष्मीच्या पूजनास दर्शनास जाण्यास खूप त्रास होत होता. तरी पण आपल्या दुःखाचं ओझ देवीवर टाकून आपल्या देहाला झालेला त्रास सहन करून त्यांचा पूजेचा नित्य नेम चालूच होता. एके दिवशी तुळजाबाईने डोळयात अश्रू आनून भाव मूढ होऊन देवींना नमस्कार करून विनंती केली, हे व्याघ्रांबी महालक्ष्मी माते आता माझ शरीर म्हातारं झालं असल्यामुळे मला तुझ्या दर्शनाला येणे होणार नाही. मला तर अशी इच्छा आहे की, माझा शेवटचा श्वास सुटेपर्यंत तूझी पूजा आरती मी करावी हीच माझी शेवटची इच्छा आहे. लगेच तुळजाची भावभक्ती जाणून आदिमाया लक्ष्मीमाता सगुण रूपात प्रगट झाली. त्या ठिकाणी लख्खः प्रकाश पडला होता. महालक्ष्मी म्हणाली ठीक आहे. मी तुझ्या भक्ती मुळे तुझया घरी येतो. परंतु तू मागे फिरून पाहायचे नाही. तुळजाबाईने महालक्ष्मीला नमस्कार केला आणि देवीचं म्हणणं कबूल केलं आणि निघाली आनंदानं घरी येण्यास, तुळजा निघाली पुढे पुढे देवी महालक्ष्मी तिच्या मागे मागे, पहा महालक्ष्मीमाता कुणाचीही भक्तीची कसोटी घेतल्याशिवाय आपलसं करत नाही. पुढे चालता चालता महालक्ष्मी मातेने आपल्या शक्तिनी त्या ठिकाणी अग्नीच्या ज्वाला निर्माण केल्या, आणि त्याच मोठं वलय निर्माण केल. त्या ठिकाणी निरनिराळे आवाज येत होते. त्यामध्ये त्या अग्नीचे चटके सुध्दा तुळजाबाईला लागत होते. त्यामुळे त्या दृश्याला भयभित होउन लगेच मागे फिरून पाहु लागली. त्यामुळे काय चमत्कार झाला की, महालक्ष्मीच तुळजाला साक्षात दर्शन झाल परंतु देविची आज्ञा मोडून मागे पाहिल्यामुळे त्याच ठिकाणी उभ्या राहिल्या तेव्हापासुन अद्याप त्याच ठिकाणी विद्यमान आहेत.''5 लोकमानस प्रमाणे देवी–देवता प्रयघन होतात. आपली भक्ती पाहून आपले सगुण रूप दाखवितात व वेळ प्रसंगी प्रगट होतात ही लोकधारणा सत्य मानल्या जाते. तेव्हा पणज येथील महालक्ष्मीची कथा लोकांनी सत्य मानली आहे. त्यामुळेच त्यांची शेकडो वर्शापासून भक्तीभावाने पूजा केली जाते.

सध्या या मंदिराच्या दिवाबत्तीचे व पूजेचे काम घटूजी गणपत राऊत यांच्या वंशात परंपरेने चालत आले आहे. त्यांची वंशावळी अशी आहे. संपत–गणपत–शाहादेव– शंकर सध्या शंकर शहादेव राउत यांच्याकडे मंदिराची व्यवस्था आहे.

### *यात्रेचे स्वरूप*

या महालक्ष्मीची यात्रा भाद्रपद शुध्द अश्टमीच्या दिवशी भरते व तीन दिवस उत्सव चालतो. नवमीच्या दिवशी जेवण दिले जाते. पूर्वी या मंदिराजवळच्या विहीरीमधून स्वयंपाकाकरिता भांडे निघत असत. याच भांडाऱ्यात देवीचा स्वयंपाक केला जात असे. परंतु आता विहीरीमधून भांडी येत नाहीत, ती प्रथा खंडीत झाली. गौरीच्या सणात येथे लोक वर्गणी करून जेवणाचा भंडारा करतात. गावजेवण दिले जाते. पूर्वी या गौरीपूजनाच्या वेळी येथे खूप मोठी यात्रा भरत असे. आकोट, मुडगाव, अंजनगाव, कारंजा लाड, दर्यापूर, कोल्हापूर येथील लोक येतात. वेगवेगळया गावाचे व्यापारी आपली दुकाने यात्रेत मांडत असत. सध्या ही यात्रा भरते परंतु फार मोठी दुकाने मांडल्या जात नाहीत. पण यावेळी देवीच्या दर्शनाला व महाप्रसादाला मात्र भरपूर लोक गर्दी करतात. त्याची मात्र संख्या वाढली आहे.

पणज येथील महालक्ष्मी जागृत असून त्या नवसाला पावतात. त्यांनी हा अनुभव घेतला असे लोक येथे आवर्जून दर्शनाला येतात. आपल्यावर देवीची कृपा व्हावी. आपली धन–धान्य श्रीमंती वाढावी. आपला वंश पुढे चालावा याकरीता लोक नवस बोलतात. तो पूर्ण करतात. देवीला सौभाग्याचे वस्त्र, अलंकार, नैवेद्य व आरती दिली जाते. आजही हे मंदिर आपले प्राचिनत्त्व जपून उभे आहे. दगडी मंदिर, भव्य दिपमाळ, लागूनच वाहणारी नदी व जुन्या पध्दतीची पायविहीर आपले प्राचिनत्त्व दर्शविते. लोक या लक्ष्मीला लोकधारणेत महत्त्व देतात व त्यांना जागृत देवी म्हणून मानताना दिसतात.

### *संदर्भ सूची*


1) व्यवहारे डॉ. शरद– 'मराठी स्त्री गीते,' प्रतिमा प्रकाशन सदाशिव पेठ पुणे– 30, प्रथमावृत्ती 2 ऑक्टोवर 1991, पृ. 121

2) ढेरे डॉ. रा. चिं. – 'लोकसाहीत्यः शोध आणि समीक्षा,' श्रीविद्या प्रकाशन पुणे 30, प्रथमावृत्ती ऑक्टोबर 1990, पृ. 77

3) लांजेवार डॉ. लता – 'वऱ्हाडी बोलीतील लोकसाहीत्यः स्वरूप व समीक्षा, 'विजयराज प्रकाशन' नागपूर 12, पहिली आवृत्ती, एप्रिल 2003 पृ 221,

4) गाडगीळ डॉ. स. रा.–'लोकायत,' लोकवाड्मयागृह प्रा. लि. मुंबई 25 व्दितीयावृत्ती जाने. 1984, पृ – 66.

5) लेखकाचा उल्लेख नाही– प्रकाशक ह.भ.प चौधरी मारोतीराव 'श्री महालक्ष्मी स्तोत्र,' (श्री वाघ्रांबी व महालक्ष्मी) संस्थान देऊळगाव वडसा, जि.यवतमाळ, आवृत्ती 28 ऑगस्ट, 2007, पृ 7, 8,